# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४६१/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. जे. डी. रॉड्रीग्ज**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (परिरक्षण) पी/दक्षिण**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त पी/दक्षिण विभाग
यांचे कार्यालय, सी.टी.एस.क्र.७४६, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प)
मुंबई -४००१०४

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता पी/दक्षिण**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त पी/दक्षिण विभाग
यांचे कार्यालय, सी.टी.एस.क्र.७४६, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प)
मुंबई -४००१०४

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २२.०१.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १०.०१.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.मु.मा.आ.नों.क्र. ९७५/२०१८ रा.मा.आ.अपील क्र. ४५३/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १३.०९.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना संबंधीत अभिलेखाचे निरीक्षण द्यावे व जी माहिती अपिलार्थींना हवी असेल त्याची साक्षांकित प्रत कलम ७(६) अंतर्गत निशुल्क पुरवावी."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १७.१०.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग, गोरेगाव (प.), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि.०७.०१.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ दक्षिण विभाग, गोरेगाव (प.), मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. २७.०१.२०२० रोजी आयोगास सादर केला.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचा अहवाल दि. २७.०१.२०२० आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, आयोगाचे आदेश दि.१३.०९.२०१९ रोजीच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना दि. २६.०९.२०१९ रोजी माहिती दिलेली आहे व तक्रारकर्ता यांनी दि. २४.१२.२०१९ रोजी माहिती स्विकारलेली आहे. तसेच, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी माहिती स्विकारल्याची नोंदही आयोगासमोर सादर केली.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
२४-१-२०२५

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : २४.०१.२०२५** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई